# प्रेस नोट

दिनांक २१/१०/२०२५

**आलोसे १) तुकाराम गंगाराम जोशी वय ५७ वर्षे, पद—सहायक पोलीस निरीक्षक नेमणूक —खडकपाडा पोलीस स्टेशन, २) विजय वामन काळे, वय ३८ वर्षे, पोलीस शिपाई/१७९६, नेमणुक —महात्मा फुले चौक पोलीस ठाणे, दोन्ही ठाणे शहर यांचेविरूध्द सापळा कारवाई करून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांनी घेतले ताब्यात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | ठाणे |
| पो. ठाणे गु.र. क्र. व कलम | खडकपाडा पोलीस स्टेशन, ठाणे शहर गु.र.क्र. ७४०/२०२५ कलम भ्र.प्र.अधि १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७,७ अ प्रमाणे |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) तुकाराम गंगाराम जोशी वय ५७ वर्षे, पद—सहायक पोलीस निरीक्षक , नेमणूक खडकपाडा पोलीस स्टेशन, ठाणे शहर<br>२) विजय वामन काळे, वय—३८ वर्षे, पोलीस शिपाई/१७९६, नेमणुक —महात्मा फुले चौक पोलीस ठाणे, ठाणे शहर |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | २,००,०००/— रूपये ( **तडजोडीअंती १,२५,०००/— रूपये लाचेची मागणी** ) |
| स्विकारलेल्या लाचेची रक्कम | १,२५,०००/— रूपये |
| थोडक्यात हकीकत | यातील लोकसेवक तुकाराम गंगाराम जोशी पद—सहायक पोलीस निरीक्षक यांनी तक्रारदार वय—६७ वर्षे रा. कल्याण पश्चिम जि.ठाणे यांचा मुलाचे विरूध्द खडकपाडा पोलीस ठाणे येथे बीएनएस कलम ६४, ११५(२), ३५२, ३५१(२) प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयात सहकार्य करण्यासाठी व त्यास जामीन मंजुर करून देण्यासाठी तपासी अधिकारी लोकसेवक जोशी यांनी ३,००,०००/— रूपये लाच मागीतली आहे अशा आशयाची तक्रार तक्रारदार यांनी दि. १८/१०/२०२५ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांचेकडे दिलेली होती. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक १८/१०/२०२५ ते दिनांक १९/१०/२०२५ रोजी पडताळणी केली असता लोकसेवक तुकाराम गंगाराम जोशी वय ५७ वर्षे, पद—सहायक पोलीस निरीक्षक नेमणूक खडकपाडा पोलीस स्टेशन, ठाणे शहर यांनी पोलीस शिपाई विजय वामन काळे, नेमणुक —महात्मा फुले चौक पोलीस ठाणे यांना तक्रारदार यांची भेट घेण्यास सांगितले असता आलोसे काळे यांनी आलोसे जोशी यांचेवतीने तक्रारदार यांच्याकडे २,००,०००/— रुपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती १,२५,०००/— रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरून लाप्रवि, ठाणे यांनी दिनांक २०/१०/२०२५ रोजी सापळा कारवाई चे आयोजन करून विजय वामन काळे , पोशि/१७९६ महात्मा फुले चौक पोलीस ठाणे यांना तक्रारदार यांच्याकडुन डॉन बास्को शाळेचे समोरील रोडवर, डी. बी. चौक, कल्याण पश्चिम जि. ठाणे येथे तक्रारदार यांच्या वाहनामध्ये पंचासमक्ष १,२५,०००/— रू. लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले तसेच आलोसे सपानि जोशी यांना खडकपाडा पोलीस ठाणे येथुन ताब्यात घेतले असुन सरकारतर्फे पोनि. प्रमोद आहिरे, लाप्रवि. ठाणे यांनी दिलेले फिर्यादीवरुन खडकपाडा पोलीस स्टेशन ठाणे शहर कल्याण पश्चिम जि. ठाणे येथे भ्र.प्र.अधि १९८८(संशोधन २०१८) चे कलम ७, ७ अ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन नमुद गुन्हयाचा तपास पोनि संतोष नावलगी, ला.प्र.वि., ठाणे हे करीत आहेत. |

मार्गदर्शन अधिकारी :— १) मा. श्री शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
२) मा. श्री सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
३) मा. श्री.भागवत सोनवणे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.

---

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका संबंधी काही तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र ठाणे यांचेशी संपर्क करावा.


संपर्क पत्ता :— ला.प्र.वि. ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर ठाणे पश्चिम — ४००६०१
सकेतस्थळ :— **acbmaharashtra@mahapolice.gov.in**
ई—मेल :— **spacbthane @mahapolice.gov.in**
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :— **acbmaharashtra.net**
टोल फ्रि नंबर :— १०६४
दुरध्वनी कमांक :— ०२२—२०८१३५९८/२०८१३५९९
संपर्क व व्हॉट्सअॅप नं :— ९९६९९१०६४


२१/१०/२०२५

( संतोष नावलगी )
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.